| | | | |
|---|---|---|---|
| दाखल तारीख : | २१. | १०. | २०२२ |
| नोंदणी तारीख : | २१. | १०. | २०२२ |
| निकाल तारीख : | २८. | ०२. | २०२३ |
| कालावधी : | वर्ष | महिन | दिवस |
| | ०० | ०४ | ०७ |

**खडकी (छावणी), पुणे येथील सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**
( पिठासीन अधिकारी सौ. वृषाली पाटील )

**नियमित फौजदारी खटला क्र.४७२/२०२२**
**CNR No. - MHPU080015382022**
**निशाणी क्रमांक : १६**

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र सरकार तर्फे,<br>खडकी पोलीस ठाणे, पुणे शहर,<br>खडकी – पुणे. | ... अभियोगपक्ष |
| | विरुध्द | |
| | अवि संजय जैन,<br>वय: २४ वर्षे, व्यवसाय: सोन्याचे दुकान चालवतो,<br>रा. फ्लॅट नं. ७०८, बी बिल्डींग, कमलकुंज,<br>चिवडा गजली, लालबाग परेल, मुंबई | ... आरोपी |

**गुन्हा**:– भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४०६, ४०९, ४२० अन्वये.

अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी.एस. काशीद
आरोपीतर्फे वकील श्री. निशांत आर्धापुरे,

## न्यायनिर्णय

( दिनांक २८/०२/२०२३ रोजी घोषित केला )

प्रस्तुतचा गुन्हा हा, आरोपी यांचेविरुध्द, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४०६, ४०९, ४२० अन्वये दाखल करण्यात आलेला आहे.

अभियोगपक्षातर्फे प्रस्तूत खटल्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे :–

२.        दि. ३०.११.२०२१ रोजी, सकाळी १०.३० वाजताचे सुमारास, ॲम्युनेशन

फॅक्टरी परिसर, खडकी, पुणे येथे, फिर्यादी श्रीपाल शाह यांनी, आरोपी अवि जैन यांचे एस. पी. गोल्ड ॲपवर दि. २८.१२.२०२१ रोजी, १०० ग्रॅम सोने व दि. २९.१२.२०२१ रोजी १०० ग्रॅम सोने असे एकूण २०० ग्रॅम चोख सोने बुक करुन, दि. ३१.१२.२०२१ रोजी, आरोपी अवि जैन यांचे एस.पी.गोल्डचे आय.सी.आय.सी.आय बॅक, झवेरी बाजार शाखा, मुंबई या बॅक खात्यावर, फिर्यादी यांचे बॅक ऑफ इंडिया, खडकी, शाखा, पुणे या बॅक खात्यातून त्याप्रती रु. ९,८६,३८६/— एन.ई.एफ.टीद्वारे जमा केले. परंतू आरोपी अवि जैन यांनी, फिर्यादी यांना सदर २०० ग्रॅम चोख सोने (२४ कॅरेट) दिले नाही व सदर सोने खरेदी पोटी ऑनलाईन घेतलेले ९,८६,३८६/— रक्कम रुपये परत न करता, फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली. म्हणून, फिर्यादी श्रीपाल निहालचंद शाह यांनी, आरोपी यांचे विरोधात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम १५४ अन्वये, खडकी पोलीस ठाणे, खडकी— पुणे शहर येथे फिर्याद दाखल केलेली आहे.

३. आरोपी यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४०६, ४०९, ४२० अन्वये खडकी पोलीस ठाणे, खडकी — पुणे शहर, येथे गुन्हा दाखल क्रमांक ५३/२०२२ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास अमर कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक, खडकी पोलीस ठाणे, खडकी — पुणे शहर यांनी केलेला आहे. सदर गुन्हयाचा सखोल तपास पुर्ण झाले नंतर, तपासी अधिकारी यांनी सदर आरोपी यांचेविरुध्द दोषारोपपत्र फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १७३ अन्वये न्यायालयामध्ये दाखल केलेले आहे.

४. आरोपी यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४०६, ४०९, ४२० अन्वये, दोषारोप निश्चीत केलेले आहेत. आरोपी यांचे विरुध्द दोषारोप निश्चित करते वेळेस, आरोपी यांनी त्यांच्या विरुध्दचे आरोप नाकारले व संपरिक्षेकरीता पसंती दर्शवलेली आहे. आरोपी यांचेविरुध्द निश्चित केलेले दोषारोप त्यांना वाचून व समजावून सांगण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये, आरोपी यांचे निवेदन नोंदवण्यात आलेले आहेत. आरोपी यांचे नोंदवलेल्या निवेदनावरुन, आरोपी यांचा असा बचाव दिसतो आहे की, आरोपी यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही.

५. अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्यांचा उहापोह केल्यानंतर तसेच फौजदारी

प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदवलेले आरोपी यांचे निवेदनावरुन, त्याचप्रमाणे अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपी यांचे वकील यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ आले व त्या मुद्दयांना मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवलेले आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. ३०.११.२०२१ रोजी, सकाळी १०.३० वाजताचे सुमारास, ॲम्युनेशन फॅक्टरी परिसर, खडकी, पुणे येथे, फिर्यादी श्रीपाल शाह यांनी, आरोपी अवि जैन यांचे एस.पी. गोल्ड ॲपवर दि. २८.१२. २०२१ रोजी, १०० ग्रॅम सोने व दि. २९.१२.२०२१ रोजी १०० ग्रॅम सोने असे एकूण २०० ग्रॅम चोख सोने बुक करुन, दि. ३१. १२.२०२१ रोजी, आरोपी अवि जैन यांचे एस.पी.गोल्डचे आय.सी. आय.सी.आय बॅक, झवेरी बाजार शाखा, मुंबई या बॅक खात्यावर, फिर्यादी यांचे बॅक ऑफ इंडिया, खडकी, शाखा, पुणे या बॅक खात्यातून रक्कम रु. ९,८६,३८६ एन.ई.एफ.टीने जमा केले. परंतू आरोपी अवि जैन यांनी, फिर्यादी यांना खरेदी केलेले २०० ग्रॅम सोने दिले नाही व सदर सोने खरेदी पोटी ऑनलाईन घेतलेले ९,८६,३८६ /— रक्कम रुपये परत न करता, फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक करुन न्यासभंग केला, असे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय? | .... नकारार्थी |
| २. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, फिर्यादी श्रीपाल शाह यांनी, आरोपी अवि जैन यांचे एस.पी. गोल्ड ॲपवर दि. २८.१२.२०२१ रोजी, १०० ग्रॅम सोने व दि. २९.१२.२०२१ रोजी १०० ग्रॅम सोने असे एकूण २०० ग्रॅम चोख सोने बुक करुन, दि. ३१.१२.२०२१ रोजी, आरोपी अवि जैन यांचे एस.पी.गोल्डचे आय.सी.आय.सी. आय बॅक, झवेरी बाजार शाखा, मुंबई या बॅक खात्यावर, फिर्यादी यांचे बॅक ऑफ इंडिया, खडकी, शाखा, पुणे या बॅक खात्यातून रक्कम रु. ९,८६,३८६ एन.ई.एफ.टीने जमा केले. परंतू आरोपी अवि जैन यांनी, फिर्यादी यांना खरेदी केलेले २०० ग्रॅम सोने दिले नाही व सदर सोने खरेदी पोटी ऑनलाईन घेतलेले ९,८६,३८६ /— रक्कम रुपये परत न करता आरोपी यांनी व्यापारी या नात्याने फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक करुन फौजदारी पात्र न्यासभंग केला, असे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय? | ... नकारार्थी |
| ३. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, फिर्यादी श्रीपाल शाह यांनी, आरोपी अवि जैन यांचे एस.पी. गोल्ड ॲपवर दि. २८.१२.२०२१ रोजी, १०० ग्रॅम सोने व दि. २९.१२.२०२१ रोजी १०० ग्रॅम सोने | |

| | | |
|---|---|---|
| | असे एकूण २०० ग्रॅम चोख सोने बुक करुन, दि. ३१.१२.२०२१ रोजी, आरोपी अवि जैन यांचे एस.पी.गोल्डचे आय.सी.आय.सी.आय बॅंक, झवेरी बाजार शाखा, मुंबई या बॅंक खात्यावर, फिर्यादी यांचे बॅंक ऑफ इंडिया, खडकी, शाखा, पुणे या बॅंक खात्यातून रक्कम रु. ९,८६,३८६ एन.ई.एफ.टीने जमा केले. परंतू आरोपी अवि जैन यांनी, फिर्यादी यांना खरेदी केलेले २०० ग्रॅम सोने दिले नाही व सदर सोने खरेदी पोटी ऑनलाईन घेतलेले ९,८६,३८६ /— रक्कम रुपये परत न करता, फिर्यादी यांची अप्रामाणिकपणे आर्थिक फसवणूक केली, असे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय? | ... नकारार्थी |
| ४. | अंतिम आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## —: **का र ण मि मां सा** :—

६. आरोपी यांचेविरुध्दचा दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणी एकूण ०१ साक्षीदाराची साक्ष नोंदविली ते खालीलप्रमाणे :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीपाल निहालचंद शाह | साक्षीदार क्र. १ | फिर्यादी | नि.क्र. ११ |

त्याचप्रमाणे, आरोपी यांचे विरुध्दचा दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नोंदवलेला आहे :—

| | | |
|---|---|---|
| १. | फिर्याद | नि.क्र. १२ |

याउलट, आरोपी यांचे तर्फे बचावात एकाही साक्षीदाराचा पुरावा नोंदवण्यात आलेला नसून, आरोपी यांनी त्यांचा बचाव हा उलटतपास व फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदवलेले आरोपी यांचे निवेदनाच्या माध्यमातून मांडलेला आहे.

### **मुद्दा क्र. ०१ ते ०३ करीता** :—

७. वरील सर्व मुद्दे परस्परपुर्वक व सलंग्न असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वरील मुद्दयांचे विवेचन एकत्रितपणे करण्यात येत आहेत. अभियोगपक्षाने आरोपी यांचेवर ठेवलेले आरोप शाबीत करण्याकरीता साक्षीदार क्र. १ यांचा पुरावा अभिलेखावर नोंदवलेला आहे. सदर साक्षीदार यांच्या पुराव्यावरुन, आरोपी यांचेविरुध्द भारतीय

दंड संहिता, १८६० चे कलम ४०६, ४०९, ४२० अन्वये, ठेवलेले आरोप ठोस व भक्कम पुराव्यानिशी सिध्द होतात का? हे पाहणे आवश्यक आहे.

८. अभियोगपक्षाने आरोपी यांचे विरुध्द ठेवलेले आरोप सिध्द करण्याकरीता साक्षीदार क्र. १ श्रीपाल शहा यांचा पुरावा अभिलेखावर नोंदवलेला आहे. सदर साक्षीदार यांनी, आरोपी अवि जैन याचे विरुध्द फिर्याद (निशाणी १२) दाखल केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, सदर साक्षीदाराचा पुरावा आरोपी यांचे विरुध्द ठेवलेले आरोप सिध्द होण्याकरीता अत्यंत महत्वाचा व आवश्यक ठरतो. त्यामुळे, सदर साक्षीदार क्र. १ श्रीपाल शहा यांच्या पुराव्याचे सखोल अवलोकन केले असता, असे स्पष्ट होते की, सदर साक्षीदार सोन्याचा व्यापार करतात. त्यांचे स्वत:चे श्री स्वस्तीक ज्वेलर्स नावाचे सोन्याचे दुकान आहे. सदर साक्षीदार हे त्यांचा सोन्याचा व्यवसाय चालवण्याकरीता, आरोपी अवी जैन यांचेकडून सोने घेत होते व त्याची होणारी किंमत कायदेशीररित्या आरोपी अवी जैन यांना देत होते. सदर साक्षीदार यांनी, दि. ३१.१२.२०२१ रोजी, रु. ९,८६,३८६ /— ही रक्कम २०० ग्रॅम सोने खरेदी पोटी, ऑनलाईन पेमेंटद्वारे आरोपी अवी जैन यांना दिलेली होती. आरोपी अवी जैन यांनी, सदर साक्षीदार यांचेकडून रु. ९,८६,३८६ /— स्विकारले, परंतू, अवी जैन यांनी, सदर साक्षीदार यांना २०० ग्रॅम सोने दिले नाही. त्यामुळे, सदर साक्षीदार यांनी, आरोपी अवी जैन याचे विरुध्द फिर्याद दाखल केली होती असे सांगितल्याचे स्पष्ट होते.

९. त्याचप्रमाणे, सदर साक्षीदार यांनी पुढे त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केल्याचे स्पष्ट होते की, दि. ३०.०७.२०२२ रोजी, आरोपी अवी जैन यांनी, सदर साक्षीदार यांचे नावे असलेले श्री स्वस्तीक ज्वेलर्स दुकान शॉप नं. ७२/१७ च्या नावाने, पावतीद्वारे, २०० ग्रॅम चोख सोने (२४ कॅरेट) अदा केलेले आहे. सदर साक्षीदार यांनी, २०० ग्रॅम चोख सोने (२४ कॅरेट) हे स्वत: पडताळणी करुन ताब्यात घेतलेले आहे. तसेच, सदर रक्कमेपैकी उर्वरीत रक्कम रुपये ९८५ /— रोख स्वरुपात आरोपी अवी जैन यांनी, फिर्यादी यांना परत दिलेली आहे असे सांगितल्याचे स्पष्ट होते.

१०. त्याचप्रमाणे, सदर साक्षीदार यांनी पुढे त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केल्याचे स्पष्ट होते की, सदर साक्षीदार यांची, आरोपी अवी जैन यांचे विरुध्द कोणतीही तक्रार नाही. त्यांना सदर केस पुढे चालवायची नाही. आरोपी अवी जैन यांनी, त्यांची फसवणूक केलेली

होती असा त्यांचा गैरसमज झालेला होता. आरोपी अवी जैन यांचे वडील संजय जैन हे आजारी असल्यामुळे, तसेच, कोव्हीड – १९ सारखा संसर्गजन्य आजारामुळे, सर्व देशभर लॉक डाउन असल्यामुळे, आरोपी अवी जैन यांना, सदर साक्षीदार यांना, सदर २०० ग्रॅम चोख सोने (२४ कॅरेट) देण्यास केवळ उशीर झाला होता व आरोपी यांनी, सदर साक्षीदार यांची कोणतीही फसवणूक केलेली नसून, त्यांना सदर २०० ग्रॅम चोख सोने (२४ कॅरेट) अदा केलेले आहे. तसेच, सदर साक्षीदार यांचे, आरोपी अवी जैन व त्यांचे वडील संजय जैन यांचेसोबत व्यवसाईक संबंध असल्यामुळे, त्यांना सदर केस पुढे चालवायची नाही असे सांगितल्याचे स्पष्ट होते.

११. अशाप्रकारे, साक्षीदार क्र. १ श्रीपाल शहा यांच्या पुराव्यावरुन असे स्पष्ट होते की, आरोपी अवी जैन यांचे वडील संजय जैन हे आजारी असल्यामुळे, तसेच, कोव्हीड – १९ सारखा संसर्गजन्य आजारामुळे, सर्व देशभर लॉक डाउन असल्यामुळे, आरोपी अवी जैन यांना, सदर साक्षीदार यांना, सदर २०० ग्रॅम चोख सोने (२४ कॅरेट) देण्यास केवळ उशीर झाला होता. म्हणून, आरोपी अवी जैन यांनी, साक्षीदार क्र. १ श्रीपाल शहा – फिर्यादी यांची फसवणूक केलेली होती असा सदर साक्षीदार यांचा केवळ गैरसमज झालेला होता असे स्पष्ट होते. दि. ३०.०७.२०२२ रोजी, आरोपी अवी जैन यांनी, सदर साक्षीदार यांचे नावे असलेले श्री स्वस्तीक ज्वेलर्स दुकान शॉप नं. ७२/१७ च्या नावाने, पावतीद्वारे, २०० ग्रॅम चोख सोने (२४ कॅरेट) साक्षीदार क्र. १ श्रीपाल शहा – फिर्यादी यांना अदा केलेले आहे. त्याचप्रमाणे, साक्षीदार क्र. १ श्रीपाल शहा – फिर्यादी यांची, आरोपी अवी जैन यांचे विरुध्द कोणतीही तक्रार नाही. त्यांना सदर केस पुढे चालवायची नाही असे स्पष्ट होते. त्यामुळे, अभियोगपक्षाने आरोपी यांचे विरुध्द ठेवलेले आरोप सिध्द होईल असा ठोस व स्पष्ट पुरावा साक्षीदार क्र. १ श्रीपाल शहा – फिर्यादी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये सांगितलेला नाही असे स्पष्ट होते.

१२. त्यामुळे, दि. ३०.११.२०२१ रोजी, सकाळी १०.३० वाजताचे सुमारास, ॲम्युनेशन फॅक्टरी परिसर, खडकी, पुणे येथे, फिर्यादी श्रीपाल शाह यांनी, आरोपी अवि जैन यांचे एस.पी. गोल्ड ॲपवर दि. २८.१२.२०२१ रोजी, १०० ग्रॅम सोने व दि. २९.१२. २०२१ रोजी १०० ग्रॅम सोने असे एकूण २०० ग्रॅम चोख सोने बुक करुन, दि. ३१.१२.२०२१ रोजी, आरोपी अवि जैन यांचे एस.पी.गोल्डचे आय.सी.आय.सी.आय बॅंक, झवेरी बाजार

शाखा, मुंबई या बॅक खात्यावर, फिर्यादी यांचे बॅक ऑफ इंडिया, खडकी, शाखा, पुणे या बॅक खात्यातून त्याप्रती रु. ९,८६,३८६/— एन.ई.एफ.टीद्वारे जमा केले. परंतू आरोपी अवि जैन यांनी, फिर्यादी यांना सदर २०० ग्रॅम चोख सोने (२४ कॅरेट) दिले नाही व सदर सोने खरेदी पोटी ऑनलाईन घेतलेले ९,८६,३८६/— रक्कम रुपये परत न करता, फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली, हे ठोस व भक्कम पुराव्यानिशी सिध्द झालेले नाही, असे स्पष्ट होते.

१३. त्याचप्रमाणे, **मदन मोहन अबीट वि. स्टेट ऑफ पंजाब, ए.आय.आर, २००८ सुप्रिम कोर्ट १९६९** या न्यायनिर्णयामध्ये, मा. सर्वोच्च न्यायालय यांनी असे विषद केले आहे की, फौजदारी वाद आपआपसात मिटला असेल तर, न्यायालयाने विनाकारण वेळ खर्च करणे उचित नाही. सबब, पुढील विस्तृत चर्चा न करता इतकेच विषद करावे लागेल की, आरोपी यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप संशयापलीकडे शाबीत होत नाही. प्रस्तुत फिर्यादी यांनी आपल्या साक्षीमध्ये सांगितलेला पुरावा हा, फिर्यादमधील मजकुराशी विसंगत आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये आपआपसात तडजोड झाल्यामुळे फिर्यादी यांनी अशी भूमिका घेतलेली असावी असे स्पष्ट होते. त्यामुळे, नैसर्गिक न्यायतत्वानुसार, फिर्यादी यांच्याविरुध्द खोटा पुरावा दिल्याबाबत कार्यवाही करणे हे न्यायोचित्त ठरणार नाही.

१४. अशाप्रकारे, अभियोगपक्षातर्फे तपासलेले साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, आरोपी यांचे विरोधात नोंदवण्यात आलेले दोषारोप सिध्द होईल असा पुरावा सदर साक्षीदाराने अभिलेखावर सांगितलेला नाही. त्यामुळे, वरील विवेचनावरुन, आरोपी यांचेविरुध्द नोंदवण्यात आलेले दोषारोप शाबित करणारा व सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपी यांचेविरुध्द ठेवलेला आरोप हा संशयाच्या पलिकडे जाऊन सिध्द होत नाही, असे स्पष्ट होते. त्यामुळे, मी, मुददा क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

१५. **<u>मुददा क्रमांक ४ बाबत :—</u>**

मुददा क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी दिल्यामुळे आरोपी यांना निर्दोष मुक्त करणे न्यायोचित्त ठरते. म्हणून मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## :: आदेश ::

| | |
|---|---|
| १. | आरोपी अवि संजय जैन यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४०६, ४०९, ४२० अन्वये दाखल केलेल्या गुन्हामधून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामिनकदबा रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ नुसार सादर केलेले प्रत्येकी रुपये १५,०००/– या किंमतीचा जामीन मुचलका आज पासून अपील कालावधीपर्यंत कायदयातील तरतुदीप्रमाणे अस्तित्वात राहील. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयासमोर घोषित केला.) |

सही/–

खडकी, पुणे.
दिनांक: २८.०२.२०२३.

( सौ. वृषाली पाटील )
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खडकी–पुणे.

## **C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for the word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | Shri. P.D. Mane, Steno L.G. |
| Court Name | :- | Smt. Vrushali K. Patil.<br>Jt.Judicial Magistrate F.C.,<br>Khadki Pune. |
| Date of decision. | :- | 28-02-2023 |
| P. O. signed on | :- | 04-03-2023 |